# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०७/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

दिनांक ०७/०७/२०२४ रोजी पोलीस ठाणे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत प्रोव्हीशन रेडकामी पेट्रोलींग करीत असता यातील आरोपी नामे – प्रविण चुडामन वाघ, वय ४८ वर्ष रा. वार्ड क्र. ४ केळवद ता. सावनेर हा नयन ढाबा येथे देशी दारु बाळगुन विक्री करताना मिळुन आल्याने त्याचे ढाब्याचे झडतीत स्वयंपाक करण्याचा जागेजवळ एका थैलीत प्रत्येकी ९० मिली देशी दारुने भरलेल्या १९ प्लॅस्टिक सिलबंद बॉटल किंमती ५७०/–रु. चा मुद्देमाल विनापरवाना विक्री करिता बाळगताना मिळुन आल्याने जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दिनांक ०७/०७/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खात्रीशीर माहिती मिळाली की, वार्ड क्र. ०१ जुनी कामठी येथे एक इसम मौजा जुनी कामठी येथे एक इसम घरासमोर हातात थैलीमध्ये देशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर खबरेवरून सदर ईसमावर रेड केली असता आरोपी गणेश प्रल्हाद फूलझेले, वय ५५ वर्ष रा जूनी कामठी ता पारशिवनी यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातील थैलीची पाहणी केली असता थैलीत २२ निपा देशी दारु भिंगरी संत्रा नं ०१ प्रत्येकी ९० एम.एल च्या एकूण १९८० एम एल कि. ७७० रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच कन्हान दुर्गा चौक कामठी येथे राहणारा आरोपी बंडू बाळाजी मेश्राम, रा. दुर्गाचौक जुनी कामठी ता पारशिवनी याचे पानठेल्याची अवैध दारूबाबत झडती घेतली असता एका कापडी पांढऱ्या रंगाच्या पिशवित ८ निपा देशी दारु भिंगरी संत्रा नं ०१ प्रत्येकी १८० एम.एल च्या एकून १४४० एम एल कि. ५६० रु. चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दि. ०८/०७/२०२४ रोजी पोस्टे देवलापार अंतर्गत पवनी येथे स्टाफ पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम आपल्या राहते घरी मोहाफुल गावठी दारू बाळगुन विक्री करीत असल्याचे माहिती मिळालेवरून आरोपी मनिराम बळीराम राउत वय ४६ वर्ष रा. पवनी याचे घराची स्टाफने घरझडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून ०५ लिटरच्या ०२ पांढऱ्या रंगाचा प्लास्टिक डबकी मध्ये १० लिटर मोहफुल गावठी दारू प्रत्येकी किं ५० रू प्रमाणे ५०० रू चा मुदेमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर